"असमर्थास समर्थ करणे"

# दि डेक्कन मर्चन्टस् को-ऑप. बँक लिमिटेड, मुंबई

मुख्य कार्यालय: २१७, राजा राममोहन रॉय मार्ग, गिरगाव, मुंबई -४०० ००४.
दूरध्वनी: ०२२-२३८९१२३३ Website: www.deccanbank.com

# जाहीर लिलाव

## जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीचा जाहीर आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७(११) अन्वये मला मिळालेल्या अधिकारान्वये थकीत कर्जदार **श्रीमती सुनंदा सुरेश भुजबळ व इतर** यांच्या विरूद्ध मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र शासन, मुंबई (परसेवा) यांच्याकडून कलम १०१ अंतर्गत वसुली दाखला मिळविलेला आहे. दि डेक्कन मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., गिरगाव, मुंबई - ४ यांना **श्रीमती सुनंदा सुरेश भुजबळ व इतर** यांच्याकडून वसुली दाखल्यापोटी **रु. ३६,३६,८७०/-** (अधिक दि. ०१.१२.२०१३ पासूनचे पुढील व्याज व इतर खर्च) येणे आहे. सदर तारण स्थावर मालमत्ता जप्त करून ताब्यात घेण्यात आलेली आहे. या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येत आहे की, श्री. विश्वनाथ शि. तळवडेकर, विशेष वसूली व विक्री अधिकारी, द्वाराः दि डेक्कन मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., गिरगांव, मुंबई-४ या धनको बँकेच्या नावे बोजा असलेली तारण स्थावर मालमत्ता जाहीर लिलावाने **"जेथे आहे, जशी आहे"** आणि **"जी आहे, जशी आहे"** या तत्त्वावर सर्वात जास्त बोली बोलणाऱ्यास विक्री करतील. याकरिता सदर मालमत्ता विक्रीसाठी मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

**तारण स्थावर मालमत्ता वर्णन**

| | |
|---|---|
| **मालमत्तेचा तपशील** | शॉप नं. ०९, शुभ होम टॉवर को-ऑप. हौ. सोसा. लि., तळ मजला, प्लॉट नं. ७८, सेक्टर २०, खारघर, नवी मुंबई ४१० २१०. |
| **एकूण क्षेत्रफळ** | बिल्ट अप - ३८६ चौ. फूट लॉफ्ट १०२ चौ. फूट |
| **आरक्षित मूल्य,** ज्यापेक्षा कमी मूल्याने मालमत्तेची विक्री केली जाणार नाही | रु. ५०,३१,०००/- (रुपये पन्नास लाख एकतीस हजार फक्त) |

**लिलावाचे ठिकाण: दि डेक्कन मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., मुंबई मध्यवर्ती कार्यालय १/१३-१४, गणानाथ को-ऑप. हौ. सो. लि., सेनापती बापट मार्ग, दादर-पश्चिम स्टेशनसमोर, दादर, मुंबई-४०० ०२८.**

**निविदा उघडण्याची व लिलावाची तारीख: शनिवार, दिनांक ११.०१.२०१४**

**लिलावाची वेळ: सायं. ५.०० वाजता**

दिनांक ११.०१.२०१४ रोजी सायंकाळी ठिक ५.०० वाजता इच्छुक खरेदीदारांच्या उपस्थितीत निविदा उघडण्यात येतील. निविदा उघडल्यानंतर निविदाकारांना आपापसात आपल्या देकार/ निविदेतील रक्कम वाढवून बोली लावण्याची संधी देण्यात येईल.

**: लिलावाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :**

१. लिलाव व विक्रीच्या अटी व नियमावली तसेच तपशील आणि निविदा अर्ज दि डेक्कन मर्चन्टस् को-ऑप. बँक लि., मध्यवर्ती कार्यालय येथे अर्जाची किंमत रु. १,०००/- भरून प्राप्त होतील.

२. इच्छुक खरेदीदारांनी मोहोरबंद लिफाफ्यातील देकार, बँकेच्या वरील पत्त्यावर दिनांक: १०.०१.२०१४ रोजी किंवा त्यापुर्वी कोणत्याही कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.३० ते ५.३० वा. वेळेत दाखल करावेत व त्यासोबत रु. ५०,०००/- इतक्या रकमेचा **"दि डेक्कन मर्चन्टस् को-ऑप. बँक लि."** च्या नावे असलेला डिमांड ड्राफ्ट जोडावा.

३. ज्यांच्या नावे मालमत्तेचा लिलाव करण्यात येईल त्यांनी विक्री अधिकाऱ्यांकडे बोली रकमेच्या १०% रक्कम दिनांक ११.०१.२०१४ रोजी भरली पाहिजे. अन्यथा त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

४. ज्यांच्या नावे मालमत्तेचा लिलाव करण्यात येईल त्यांना विक्री अधिकाऱ्याकडे पुढील १५% रक्कम ८ दिवसात व उर्वरीत ७५% रक्कम ३० दिवसांत भरून विक्री व्यवहार पूर्ण करावा लागेल.

५. उक्त मालमत्ता हस्तांतरीत करण्याबाबतचा संपूर्ण खर्च तसेच सरकारी कर, विमा, थकबाकी व इतर कर इत्यादी खरेदीदारांनीच अदा करावयाचे आहेत.

६. लिलाव केव्हाही रद्द करण्याचे, तहकूब करण्याचे व पुढे ढकलण्याचे अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी, मुंबई यांच्याकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

७. मालमत्तेच्या पाहणीसाठी बँकेच्या वरील पत्त्यावर कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत संपर्क साधल्यास संबंधित अधिकाऱ्यामार्फत सदर मालमत्तेची पाहणी करण्याची व्यवस्था केली जाईल.

स्थावर मालमत्तेच्या लिलाव विक्री आयोजनाबद्दल संबंधित कर्जदार/जामिनदार यांना ही जाहिरात वैधानिक सूचना समजण्यात यावी.
हा जाहीरनामा दि. १३.१२.२०१३ रोजी प्रसिद्ध केला.

सही/-
**श्री. विश्वनाथ शिवाजी तळवडेकर**
दि डेक्कन मर्चन्टस् को-ऑप बँक. लि., मुंबई.
विशेष वसुली आणि विक्री अधिकारी
दूरध्वनी: ०२२-२३८९१२३३.

शिक्का

दिनांक: १४.१२.२०१३

24 x 8